# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.५९२१/२१/अ.क्र.४७५/२५/०१

**श्री. इक्बाल आर खान**
ए/१५, रुम नं. १०, यशवंतराव चव्हाण नगर,
घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, मंडाळा,
मानखुर्द (प), मुंबई – ४०० ०४३.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१) के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
म.न.पा. मुंबई इमारत, पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू)
मुंबई – ४०० ०६९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
म.न.पा. मुंबई इमारत, पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू)
मुंबई – ४०० ०६९.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०९.२०२० | ०६.११.२०२० | १०.१२.२०२० | ०४.०३.२०२१ |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६.०९.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "के/पूर्व विभागातील कामे करण्यासाठी दि. २१.०३.२०१९ रोजी देण्यात आलेली पी.ओ.क्र. ४१०००५२९८५" याबाबत मुद्देनिहाय माहितीची मागणी केली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.११.२०२० रोजी अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीकरिता योग्य ते शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल",असे कळविले आहे.

त्यानंतर अपीलार्थी यांनी दि. १०.१२.२०२० रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरले असून देखील माहिती देण्यात आली नाही व संपूर्ण माहिती देण्यास टाळाटाळ केली असून माझी दिशाभूल करण्यात आलेली आहे", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर "जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१)

के/पूर्व विभाग यांनी अपीलार्थी यांना दि. १२.०३.२०२१ रोजी दुपारी ४.३० वा माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या पी.ओ. क्रमांकासंबंधित कामाची फाईल दाखवून अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.क्र. १ ते १६ बाबत निरिक्षण देऊन अपीलकाराच्या शंकांचे निराकरण करावे तसेच अ.क्र. १ ते १६ पैकी अभिलेखात उपलब्ध असलेली कागदपत्रे ७ दिवसांत अपीलाकारास विनामुल्य पोस्टाने पाठविण्यात यावीत" असे आदेश पारित केले आहे.

तद्नंतर अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि. २०.०५.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी यांनी आदेशाची अंमलबजावणी केलेली नाही. आजपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आलेली नाही. सदरची माहिती अपूर्ण देण्यात आली आहे. सदर माहिती देण्यास टाळाटाळ केली असून माझी दिशाभूल करण्यात आलेली आहे",असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०८.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१) के/पूर्व विभाग व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग अनुपस्थित आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी यांनी सादर केलेला मुळ माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज हा ज्या कालावधीत सादर केलेला होता, त्या कालावधीत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेली वैद्यकीय आणीबाणीची परिस्थिती, त्यामुळे महाराष्ट्र शासनाने Epidemic Diseases Act खाली जारी केलेले दिशानिर्देश तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Sue Moto W.P. (Civil) No.३/२०२० मध्ये दिनांक ०८ मार्च २०२१ च्या न्याय निर्णयान्वये या कायद्यातील विहीत कालमर्यादेतून दिनांक १५.०३.२०२० ते १४.०३.२०२१ हा कालावधी वगळण्याचे आदेश केले आहेत. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले दिशानिर्देश तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या पुर्ण पिठाने कोरोना कालावधीत झालेल्या विलंब क्षमा करण्याबाबत जारी केलेले दिशानिर्देश इत्यादी अवलोकन केले असता, सदर प्रकरणी दाखल केलेला माहिती अर्ज व प्रथम अपिल अर्ज ज्या कालावधीत केलेला आहे संबंधित कालावधी हा कोविड-१९ चा प्रादुर्भावाचा कालावधी असल्यामुळे प्राधिकरणाच्या वतीने सादर केलेला मान्य करण्याजोगा आहे. सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१) के/पूर्व विभाग यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २(च) नुसार उपलब्ध असलेली माहिती तात्काळ विनामुल्य अपिलार्थीस प्रदान करावी. तसेच प्रदान करण्यात आलेली माहितीची पोच आयोगास सादर करावी. प्रस्तुत व्दितीय अपील अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.

## आदेश

१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.
२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०८.०५.२०२५

State Information Commission Maharashtra

( राहुल पांडे )
राज्य मुख्य माहिती आयुक्त